पुढारी

पान नं. ४
शुक्रवार :- ७ एप्रिल २०२३

# 'मुकुल माधव, फिनोलेक्स'ची सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद

## डॉ. महेंद्र गावडे : राजापूर तालुक्यात क्षयरुग्णांना आहार साहित्याच्या किटचे वाटप

राजापूर : पुढारी वृत्तसेवा

मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांनी 'निक्षय मित्र' म्हणून दातृत्वाची भूमिका बजावत जोपासलेली सामाजिक बांधिलकी निश्चितच कौतुकास्पद आहे. समाजातील अशा दातृत्वामुळे 'क्षयरोगमुक्त भारत' होण्यास निश्चितच सकारात्मक पाठबळ मिळेल, असे गौरवोद्‌गार अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. महेंद्र गावडे यांनी काढले.

मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांच्या वतीने क्षय रुग्णांना आहाराच्या साहित्याच्या किटचे वाटप करण्यात आले. यावेळी सर्व रुग्णांनी वेळेमध्ये औषधोपचार आणि आहार घेण्याचा सल्लाही डॉ. गावडे यांनी दिला.



राजापूर : आहाराच्या साहित्याचे वाटप करताना मुकुल माधव फाऊंडेशन व फिनोलेक्सचे पदाधिकारी.

क्षयरोगमुक्त भारत अभियानांतर्गत मुकुल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि जिल्हा प्रशिक्षण केंद्र, रत्नागिरी यांच्या वतीने तालुक्यातील रुग्णांना आहार साहित्याच्या किटचे वाटप करण्यात आले.

राजापूर येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये झालेल्या या कार्यक्रमावेळी जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सूर्यवंशी, फिनोलेक्सचे व्यवस्थापक संदीप गोगले, अभिषेक साळवी, ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. मंगला चव्हाण, धारतळे आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिल परांजपे, तालुका आरोग्य विभागातील आरोग्य पर्यवेक्षक श्री. तावडे, आरोग्य सहायक श्री. धानबा, आचल मेळेकर, राजेश गेल्ये, श्री. कागले, श्री. कोकणे आदी उपस्थित होते. डॉ. सूर्यवंशी यांनीही रुग्णांना औषधोपचार आणि आहारासंबंधित सविस्तर मार्गदर्शन केले.

'क्षयरोगमुक्त भारत' अभियान यशस्वी करण्यासाठी 'निक्षय मित्र' म्हणून समाजातील दात्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले. यावेळी मान्यवरांसह फिनोलेक्स इंड्रस्ट्रीजच्या अधिकाऱ्यांच्या हस्ते रुग्णांना सकस आहाराच्या साहित्याच्या किटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. परांजपे यांनी केले.

तरुण भारत

पान नं. 11

शुक्रवार ७ एप्रिल २०२३

# निक्षय मित्रांकडून राजापुरातील क्षय रूग्णांना आहार किटचे वाटप

वार्ताहर

राजापूर

मुकूल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांनी 'निक्षय मित्र' म्हणून दातृत्वाची भूमिका बजावत जोपासलेली सामाजिक बांधिलकी निश्चितच कौतुकास्पद आहे. समाजातील अशा दातृत्वामुळे 'क्षयरोग मुक्त भारत' होण्यास निश्चितच सकारात्मक पाठबळ मिळेल, अशा शब्दामध्ये अतिरीक्त जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.महेंद्र गावडे यांनी मुकूल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांचे कौतूक केले.

यावेळी त्यांनी सर्व रूग्णांनी



राजापूर : किटचे वाटप करताना मुकूल माधव फाऊंडेशन व फिनोलेक्स इंडस्ट्रीजचे पदाधिकारी.

वेळेमध्ये औषधोपचार आणि आहार घेण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते मुकूल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांच्यावतीने रूग्णांना देण्यात आलेले आहाराच्या साहित्याच्या किटचे वाटप करण्यात आले.

क्षयरोग मुक्त भारत अभियानांतर्गत मुकूल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि जिल्हा प्रशिक्षण केंद्र, रत्नागिरी यांच्यावतीने तालुक्यातील रूग्णांना आहार साहित्याच्या किटचे वाटप करण्यात आले.

राजापूर ग्रामीण रूग्णालयामध्ये झालेल्या या कार्यक्रमाच्यावेळी जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी, डॉ.सुर्यवंशी, फिनोलेक्सचे व्यवस्थापक संदीप गोगले, अभिषेक साळवी, ग्रामीण रूग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ.मंगला चव्हाण, धारतळे आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.निखील परांजपे, तालुका आरोग्य विभागातील आरोग्य पर्यवेक्षक तावडे, आरोग्य सहाय्यक धानबा, आंचल मेळेकर, राजेश गेल्ये, कागले, कोकणे आदी उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना डॉ.सुर्यवंशी यांनीही रूग्णांना औषधोपचार आणि आहारासंबंधित सविस्तर मार्गदर्शन केले. 'क्षयरोग मुक्त भारत' अभियान यशस्वी करण्यासाठी 'निक्षय मित्र' म्हणून समाजातील दात्यांनी सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.

यावेळी मान्यवरांसह फिनोलेक्स इंडस्ट्रीजच्या अधिकाऱ्यांच्या हस्ते रूग्णांना सकस आहाराच्या साहित्याच्या किटचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.परांजपे यांनी केले.

सकाळ [TODAY] पान नं: ४

शुक्रवार :- ७ एप्रिल 2023

# फिनोलेक्सची सामाजिक बांधिलकी कौतुकास्पद

## डॉ. महेंद्र गावडे : राजापुरात क्षय रुग्णांना आहाराचे किट वाटप

राजापूर, ता. ६ : मुकूल माधव फाउंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांनी 'निक्षय मित्र' म्हणून दाखवलेली सामाजिक बांधिलकी निश्चितच कौतुकास्पद आहे. समाजातील अशा दातृत्वामुळे 'क्षयरोग मुक्त भारत' होण्यास निश्चितच सकारात्मक पाठबळ मिळेल, अशा शब्दात अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. महेंद्र गावडे यांनी कौतुकोद्गार काढले. सर्व रुग्णांनी वेळेत औषधोपचार आणि आहार घ्यावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

क्षयरोग मुक्त भारत अभियानांतर्गत मुकूल माधव फाऊंडेशन आणि फिनोलेक्स इंडस्ट्रीज आणि जिल्हा प्रशिक्षण केंद्र यांच्यावतीने तालुक्यातील रूग्णांना आहार साहित्याच्या किटचे वाटप करण्यात आले. येथील ग्रामीण रूग्णालयामध्ये झालेल्या या कार्यक्रमवेळी जिल्हा प्रशिक्षण केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सूर्यवंशी, फिनोलेक्सचे व्यवस्थापक संदीप गोगले, अभिषेक साळवी, ग्रामीण रूग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक डॉ. मंगला चव्हाण, धारतळे आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. निखील परांजपे, तालुका आरोग्य विभागातील आरोग्य पर्यवेक्षक श्री. तावडे, आरोग्य सहाय्यक श्री. धानबा, आचल मेळेकर, राजेश गेल्ये, श्री. कागले, श्री. कोकणे आदी उपस्थित होते. यावेळी डॉ. सुर्यवंशी यांनी रूग्णांना औषधोपचार आणि आहारासंबंधित मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. परांजपे यांनी केले.



**राजापूर : रुग्णांना किटचे वाटप करताना अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेंद्र गावडे, डॉ. सूर्यवंशी, फिनोलेक्सचे व्यवस्थापक संदीप गोगले, अभिषेक साळवी, डॉ. मंगला चव्हाण.**